दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com
Scan QR code to visit... Epaper Portal
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक १८८ • Title - Code :- MAHMAR49513 • बुधवार दि.१० एप्रिल २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# संसदेत भाषणं करून विकास होत नाही
# अजित पवारांचा सुप्रिया सुळेंवर हल्लाबोल
## पवार आडनाव असलेल्या उमेदवारालाच निवडून द्या-अजित पवार

**बारामती (वृत्तसंस्था)-पूर्वी बारामतीत मत मागत असताना एक लेव्हल होती, पण आता ती लेव्हल सोडली जात आहे. भावनिक केलं जात आहे. नुसतं संसदेत भाषण देऊन विकासकामे होत नाही, त्यासाठी निधी आणावा लागतो, असे म्हणत अजित पवार यांनी सुप्रिया सुळे यांना टोला लगावला. तर तुम्ही साहेबांना (शरद पवार) निवडून दिले, त्यांच्या मुलीला निवडून दिले आता सुनेत्रा पवारांना निवडून द्या, पवार आडनावाच्या उमेदवारालाच विजयी करा, अशी साद देखील अजित पवार यांनी बारामतीकरांना घातली.उपमुख्यमंत्री अजित पवार पुढे बोलताना म्हणाले की, काही लोक संसदेत चांगल बोलतात म्हणजे विकास होत नाही. मी देखील भाषणात पटाईत आहे. माझा देखील पट्टी लागली तर मी भाषणही करतो अन् निधीही आणतो, कामही करतो तर एखादे काम वाजवून देखील पूर्ण करून घेतो, मतदान मागताना आता काही लोक तुम्हाला भानविक करत आहेत, पण बारामतीच्या विकासासाठी तुम्हाला योग्य निर्णय घ्यायचा आहे, असे म्हणत अजित पवार यांनी सुप्रिया सुळेंसह शरद पवारांना टोला लगावला.**

अजित पवार पुढे म्हणाले की, मी काम करत असताना माझ्यावर काही कार्यकर्ते नाराज आहे. सगळेच खूश आहेत असे मी म्हणत नाही. तुम्ही माझ्यावर विश्वास ठेवा त्यात मी मार्ग काढेन. माझ्याबरोबर काम करणारा चूकला म्हणून त्याचा दंड मला किंवा उमेदवाराला देऊ नका, अशीही साद अजित पवारांनी घातली.उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, मला बारामतीकरांनी सात सात वेळा मला निवडून दिल्याने मला बारकावे मला माहित झाले. त्यासाठी जरी रोज तुम्हाला भेट नसलो तरी तिथे बसून मी कामे पूर्ण करतो. विशेष म्हणजे केंद्राच्या विविध योजना देखील असतात त्या आपल्याला या मतदारसंघात आणून येथील विकासमार्गांना गती द्यायची आहे.११ तारखेला सासवडला मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री उपस्थितीत सभा होणार आहे. जेजुरीच्या नाझरे धरणात सुद्धा पाणी आणणार आहे. हे माझ्या अनेक





दिवसांपासून डोक्यात आहे. बारामती लोकसभा मतदारसंघात फॉर्म भरल्यानंतर शेवटची सभा व्हायची. आता का फिरावं लागतंय? विकासाचा ओघ चालू ठेवायचा असेल तर आपला खासदार निवडून द्या. भावनिक होऊ नका, कुठलीही गोष्ट करायची ती चांगली करायची हा माझा स्वभाव आहे, असं म्हणत अजित पवारांनी शरद पवार यांच्यावर टीका केली आहे.केंद्रीय मंत्री नितीन गडकरी सर्वांना मदत करतात. आपल्याला देखील गडकरी यांनी मदत केली. त्यांचे खूप खूप धन्यवादनमो रोजगार मेळाव्यासंदर्भात काहींनी टीका केली. फक्त १० हजार नोकऱ्या दिल्या गेल्या म्हणून. परंतु आपण १ हजार तरी नोकऱ्या दिल्या का?, असा अजित पवार यांनी सुप्रिया सुळे यांना सवाल विचारला.लोकं म्हणतील आमदारकी असताना खासदारकी कशाला? बारामती लोकसभा मतदारसंघाचा विकास करण्यासाठी खासदार हवा आहे. उमेदवारीचा अर्ज भरला आता एवढ केलंय. निवडून आल्यावर किती कामे करतो बघत राहाल. काही काही लोकांना फोन येत आहेत. मला फोन करण्याइतपत वेळ नाही. लोकसभा निवडणुकीसाठी राज्यभर फिरायचं आहे. आचारसंहिता असताना देखील निवेदनाचा गठ्ठा आलाय. लोकांना काम करतो म्हणून निवेदन देतात, असं अजित पवार म्हणाले.

### दिव्यांगाच्या एका मतासाठी यंत्रणा दुर्गम गावात
## महाराष्ट्र-तेलंगणा सीमेवरील महाराजगुडा येथे गृहमतदानातून नोंदविले मत




**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूरच्याच नव्हे तर राज्याच्या टोकावर असलेला जिवती तालुका.... त्यातच दुर्गम भाग आणि महाराष्ट्र - तेलंगणा राज्याच्या सीमेवर असलेले महाराजगुडा गाव....गावातील एकूण मतदार २८१.....आणि यात एक दिव्यांग मतदार. होय, या एका दिव्यांग व्यक्तिच्या मतदानासाठी निवडणूक यंत्रणा गावात पोहचते आणि गृह मतदानाच्या माध्यमातून लोकशाहीसाठी अमूल्य असलेले मत नोंदविते. हीच लोकशाहीची खरी ताकद.

सुदृढ लोकशाहीसाठी प्रत्येक मत महत्वाचे आहे. कोणताही मतदार मतदानापासून वंचित राहू नये, या उद्देशाने भारत निवडणूक आयोगाने यावर्षी प्रथमच ८५ वर्षांवरील मतदार आणि ४० टक्क्यांपेक्षा जास्त दिव्यांगाचे प्रमाणपत्र असलेल्या मतदारांसाठी गृह मतदानाची सोय उपलब्ध करून दिली आहे. याच अनुषंगाने चंद्रपूर लोकसभा मतदारसंघात जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी विनय गौडा यांच्या मार्गदर्शनात ८ ते १४ एप्रिल या कालावधीत गृह मतदानाची प्रक्रिया पार पाडण्यात येत आहे. याचा शुभारंभ सोमवारी (दि.८) अतिदुर्गम असलेल्या जीवती तालुक्यात झाला.

महाराष्ट्र आणि तेलंगणा राज्याच्या सीमेवर असलेल्या महाराजगुडा येथील सुरेखा तुकाराम राठोड (वय ४०) या एकमेव दिव्यांग असलेल्या महिलेने गृह मतदानाची इच्छा व्यक्त केली होती. त्यानुसार प्रशासनाने त्यांच्याकडून नमुना १२ - डी भरून घेतला होता. सुरेखा यांचे गृह मतदान घेण्यासाठी सोमवारी (दि. ८) जीवती तालुक्यातील टीम क्रमांक १०, महाराजगुडा येथे सुरेखा यांच्या घरी पोहचली. गृह मतदानाची संपूर्ण प्रक्रिया समजावून सांगितल्यानंतर सुरेखा यांनी आपले अमुल्य मत नोंदविले. सुरेखा ह्या पूर्णपणे दिव्यांग असून त्या एका क्षणासाठीसुध्दा उभ्या राहू शकत नाही. त्यामुळे त्यांनी आपले मत घरातच स्थापन केलेल्या मतदान कक्षात बसूनच नोंदविले आणि मतपत्रिका लिफाफ्यामध्ये टाकून अधिका-यांकडे सुपूर्द केली.यासोबतच सदर टीमने राज्याच्या सीमेवरील नारपठार (विजयगुडा) येथील जमुनाबाई दुर्गे आत्राम (वय ९०), संग्राम किसन कोरपल्लीवार (वय ८९) आणि मुद्रीकाबाई संग्राम कोरपल्लीवार (८५) या वयोवृध्द नागरिकांचेही गृह मतदानाद्वारे मत नोंदविले. या टीममध्ये मतदान अधिकारी नंदकिशोर उपासणी, नागेश उरकुडे, सुक्ष्म निरीक्षक (मायक्रो ऑब्जर्झव्हर) शिवशंकर उपरे, क्षेत्रीय अधिकारी संदीप लंगडे, विलास वानखेडे, पोलिस अंमलदार कौमुद मडावी आणि छायाचित्रकार प्रफुल गिरसावडे उपस्थित होते.

मतदानाची गोपनीयता : गृह मतदान करतांना मतदान प्रक्रियेची गोपनीयता पाळण्याच्या सूचना भारत निवडणूक आयोगाने दिल्या आहेत. त्यानुसार फॉर्म १३ - ए (डिक्लरेशन), फॉर्म १३ - बी (कव्हर ए लिफाफा), फॉर्म १३ - सी (कव्हर बी लिफाफा) आणि फॉर्म १३ - डी (मतदान कसे करायचे याबाबत सुचना) आदी प्रक्रियेबाबत अधिकारी व कर्मचा-यांनी सुरवातीला मतदारांना माहिती दिली. यावेळी घरामध्ये स्थापन केलेल्या मतदान कक्षामध्ये सदर मतदारांनी आपले मत नोंदविले. यावेळी मतदान करतांना कोणताही दुसरा व्यक्ती त्यांच्याजवळपास नव्हता. मतपत्रिका घडी केल्यानंतर सदर मतपत्रिका छोट्या लिफाफामध्ये आणि नंतर मोठ्या लिफाफामध्ये टाकून मतपेटीत जमा करण्यात आली.

## चंद्रपूर जिल्ह्यात कलम ३७ (१) (३) लागू

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूर जिल्हयात सार्वजनिक शांतता आणि कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) आणि (३७) (३) अन्वये दिनांक १ एप्रिल ते दिनांक १५ एप्रिलच्या मध्यरात्री १२ वाजेपर्यंत प्रतिबंध घालण्याचे आदेश जिल्हाधिकारी तसेच जिल्हादंडाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी निर्गमित केले आहे.

आदेशानुसार राजकीय पक्ष, कामगार संघटन आंदोलने, जातीय सामाजिक संघटनांकडून करण्यात येणारे आंदोलने, निदर्शने, मोर्चा तसेच अतिमहत्वाचे व्यक्तीचे दौरा कार्यक्रम, विविध सण, सध्या देशात व राज्यातील लोकसभा सार्वत्रिक निवडणूक तसेच चालू घडोमाडी संबंधाने व जिल्हयात होणारी विविध राजकीय/ सामाजिक/जातीय कार्यक्रम, आंदोलने व निदर्शने इत्यादी आंदोलने कार्यक्रमामुळे तसेच सण व उत्सव दरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याच्या दृष्टीने चंद्रपूर जिल्हयात प्रतिबंध लागू करण्यात आले आहे.

या कालावधीत कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याच्या दृष्टीने विवक्षित कृतींना मनाई करणे व अव्यवस्थेला प्रतिबंधात्मक उपाय करणे आवश्यक आहे. तरी सदर कालावधीत शस्त्र, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदूका, सुरे, काठया, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल, अशी इतर कोणतीही वस्तू बरोबर नेणे. कोणताही दाहक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ बरोबर नेणे, दगड किंवा इतर क्षेपणास्त्रे किंवा क्षेपणास्त्र सोडावयाची किंवा फेकावयाची उपकरणे किंवा साधने बाळगणे, जमा करणे किंवा तयार करणे.व्यक्तीच्या किंवा प्रेताच्या किंवा आकृत्या किंवा त्यांच्या प्रतिमा यांचे प्रदर्शन करणे. जाहीरपणे घोषणा करणे, गाणी म्हणने, वाद्ये वाजविणे. ज्यामुळे सभ्यता अगर नितीमत्ता यास धक्का पोहोचेल अशी किंवा राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा ज्यामध्ये उलथवून टाकण्याची प्रवृत्ती दिसून येत असेल अशी आवेशपूर्ण भाषणे करणे, हावभाव करणे, अगर सौग आणणे आणि अशी चित्रे, चिन्हे, फलक किंवा इतर कोणताही जिन्नस किंवा वस्तू तयार करणे त्याचे प्रदर्शन करणे किंवा त्याचा जनतेत प्रसार करणे इत्यादीस प्रतिबंध करण्यात येत आहे.

तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी अथवा संबंधित पोलिस स्टेशन अधिकारी यांचे पूर्वपरवानगी शिवाय कोणीही सभा, मोर्चा, उत्सव व मिरवणूक काढू नये, पाच किंवा त्यापेक्षा जास्त इसम सार्वजनिक जागेत, सार्वजनिक रस्त्यावर किंवा सार्वजनिक चावडीवर जमा होणार नाहीत किंवा कोणतेही कार्यक्रम आयोजित करणार नाही, याची नोंद घ्यावी. सदर आदेश ०१.०४.२०२४ चे ००.०१ वा. ते दिनांक १५.०४.२०२४ चे २४.०० वाजेपर्यंत संपूर्ण चंद्रपुर जिल्ह्याकरीता लागू राहील, असे जिल्हाधिकारी तसेच जिल्हादंडाधिकारी विनय गौडा जी.सी.यांनी निर्गमित केलेल्या आदेशात नमुद आहे.

## राहुल गांधी यांची राज्यातील प्रचारात होणार एन्ट्री;१३ एप्रिल रोजी विदर्भात सभा

**मुंबई**-राज्यातील लोकसभा निवडणुकीतील पहिल्या टप्प्यात होणाऱ्या पाच लोकसभा मतदारसंघातील प्रचार आता शेवटच्या टप्प्यात पोहोचला आहे. या मतदारसंघात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नंतर आता काँग्रेसचे माजी राष्ट्रीय अध्यक्ष राहुल गांधी यांची १३ एप्रिल रोजी सभा होणार आहे. राहुल गांधी यांच्या महाराष्ट्र दौऱ्यासंदर्भात काँग्रेस नेत्यांची महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत नेत्यांमध्ये विविध जबाबदाऱ्या वाटण्यात आल्या आहेत. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या मतदारसंघात ही सभा होणार असल्याने त्यांच्या माध्यमातून एक समिती गठीत करण्यात आली आहे.

महाराष्ट्रातील पहिला टप्प्यातील पाच लोकसभा मतदारसंघात होणाऱ्या निवडणुकीच्या प्रचारासाठी काँग्रेसचे



माजी राष्ट्रीय अध्यक्ष आणि वायनाड मधील काँग्रेसचे उमेदवार राहुल गांधी हे १३ एप्रिल रोजी विदर्भात सभा घेणार आहेत. त्यांच्या सभेची काँग्रेसच्या नेत्यांच्या वतीने तयारी सुरू करण्यात आली आहे. यामध्ये गर्दी जमवण्यासाठी तसेच विविध मुद्द्यांवर काँग्रेस नेत्यांमध्ये चर्चा झाली. राहुल गांधी यांची सभा विक्रमी मतदारांच्या उपस्थितीत व्हावी, यासाठी काँग्रेसने तयारीला सुरुवात केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची नुकतीच चंद्रपूर येथे सभा पार पडली. या सभेमध्ये त्यांनी उद्धव ठाकरे यांच्यासह शरद पवार आणि काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांवर अनेक आरोप केले आहेत. त्यानंतर पुन्हा एकदा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची १० एप्रिल रोजी नागपूर आणि रामटेक मतदारसंघासाठी सभा होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सभेनंतर राहुल गांधी यांची सभा होणार असल्याने त्यांच्या सभेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. राहुल गांधी या सभेच्या माध्यमातून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना प्रत्युत्तर देतील अशी शक्यता वर्तवली जात आहे.

## जागा वाटपात राज्यातील काँग्रेस नेत्यांची वर्षा गायकवाडांकडून दिल्लीत तक्रार

**मुंबई**-महाविकास आघाडीचे जागावाटप जाहीर झाले असले तरी देखील आघाडीतील घटक पक्षांचे नाराजीनाट्य अद्याप संपलेले नाही. एकीकडे सांगली लोकसभा मतदारसंघातून काँग्रेसचे नेते विश्वजीत कदम नाराज आहेत तर दुसरीकडे मुंबई काँग्रेसच्या अध्यक्षा वर्षा गायकवाड यांनी देखील महाविकास आघाडीच्या जागा वाटपावर नाराजी व्यक्त केली आहे. या विषयी काँग्रेस नेत्या वर्षा गायकवाड यांनी दिल्लीत तक्रार देखील केली आहे. के. सी. वेणूगोपाल यांना फोन करून वर्षा गायकवाड यांनी राज्यातील काँग्रेस नेत्यांची तक्रार केली असल्याची माहिती समोर आली आहे.

मुंबईतील दक्षिण मध्य लोकसभा मतदारसंघाची जागा काँग्रेसला मिळावी यासाठी वर्षा गायकवाड यांनी आग्रह धरला होता. मात्र, जागा वाटपामध्ये राज्यातील स्थानिक नेत्यांनी ही जागा उद्धव ठाकरे यांच्याकडे सोपवली आहे. त्यामुळे आता मुंबई काँग्रेसच्या अध्यक्षा वर्षा गायकवाड यांनी




नाराजी व्यक्त केली आहे. राहुल गांधी यांची भारत जोडो न्याय यात्रा मुंबईत दाखल झाली होती. त्यावेळी सर्वात जास्त प्रतिसाद हा धारावीमधून मिळाला होता. त्यामुळे दक्षिण मध्य मुंबईची जागा ही काँग्रेसला मिळावी यासाठी वर्षा गायकवाड सुरुवातीपासूनच आग्रही होत्या. मात्र, आता जागा वाटप ती जागा उद्धव ठाकरे यांच्या गटाला सुटल्याचे जाहीर करण्यात आले आहे. त्यामुळे वर्षा गायकवाड यांनी थेट दिल्ली काँग्रेस नेत्यांकडे याबाबतची तक्रार केली आहे.सांगली लोकसभा मतदारसंघातून काँग्रेसचा उमेदवार विजयी होईल, असा दावा विश्वजीत कदम यांनी केला होता. मात्र, असे असताना देखील सांगली लोकसभा मतदारसंघातून उद्धव ठाकरे यांनी चंद्रहार पाटील यांना उमेदवारी जाहीर केली होती. असे असतानाही विश्वजीत कदम सांगली लोकसभा मतदारसंघाबाबत आशादायी होते. सांगली लोकसभा मतदारसंघातून काँग्रेसचे उमेदवार विशाल पाटील लोकसभेवर निवडून जातील, असा दावा त्यांनी केला होता. मात्र, त्यांना राज्यातील वरिष्ठ नेत्यांची साथ मिळाली नाही. त्यामुळे आता सांगली लोकसभा मतदारसंघ उद्धव ठाकरे गटाला सोडण्यात आला आहे. मात्र त्यानंतरही विश्वजीत कदम आणि सांगली काँग्रेसचे पदाधिकारी नाराज असल्याची चर्चा आहे. त्यामुळे आता विशाल पाटील हे अपक्ष निवडणूक लढवणार का? अशी शक्यता वर्तवली जात आहे.

# अशोक परांजपेः पट्टीचे मराठी गीतकार!

**चैत्र महिन्याला सिंधीमध्ये चेत म्हणतात आणि चंद्राला चंद म्हणतात, म्हणून चेतीचंद म्हणजे चैत्राचा चंद्र. चेतीचंद हा युगपुरुषाचा अवतार भगवान झुलेलाल यांचा जन्मदिवस म्हणून ओळखला जातो. भगवान झुलेलालजींना पाणी आणि प्रकाशाचा अवतार मानले गेले आहे. असे म्हणतात की प्राचीन काळी सिंधी समाजातील लोक जलमार्गाने प्रवास करत असत. अशा परिस्थितीत ते जलदेव झुलेलालंना आपला प्रवास सुखरूप होण्यासाठी प्रार्थना करायचे आणि प्रवास यशस्वी झाल्यावर भगवान झुलेलाल यांचे आभार व्यक्त करायचे. या परंपरेला अनुसरून चेतीचंदचा सण मानला जातो. असे मानले जाते की भगवान झुलेलालची पूजा केल्याने मनुष्याचे सर्व अडथळे दूर होतात आणि व्यवसाय आणि नोकरीमध्ये प्रगतीचा मार्ग सुकर होतो.**

दरवर्षी चैत्र महिन्यातील शुक्ल पक्षाच्या दुसऱ्या दिवशी चेटीचंद आणि झुलेलाल जयंती साजरी केली जाते. सिंधी समाजासाठी या दिवसाला विशेष महत्त्व आहे, कारण या दिवसापासून सिंधी हिंदूंचे नवीन वर्ष सुरू होते. चेटीचंदच्या दिवशी सिंधी समाजातील लोक भगवान झुलेलालची भक्तिभावाने पूजा करतात. मान्यतेनुसार, संत झुलेलाल हे वरुण देवाचे अवतार मानले जातात. जेव्हा जगात अत्याचार वाढले आहेत, तेव्हा देवाने आपल्या भक्तांसाठी पृथ्वीवर जन्म घेतला आहे. ही गोष्ट अनेक काळापासून चालत आली आहे, पुष्कळ देवता आणि संत भारत देशात जन्माला आले आणि जगाला योग्य आणि अयोग्य यामधील फरक समजावून सांगितले. सर्व सामाजिक धर्मांचे देव या पृथ्वीवर पाप संपवण्यासाठी आले आहेत– राम, कृष्ण, येशू फक्त काही लोक आहेत. अजून एक देव या पृथ्वीवर आला, ज्याला झुलेलाल म्हणून ओळखले जाते. त्याला सिंधी जातीचा इष्ट देव म्हणतात. हा दहाव्या शतकाच्या आसपास जन्मलेला हिंदू जातीचा भगवान वरुणचा अवतार आहे. काही लोक त्यांना सूफी संत देखील म्हणतात, ज्यांचे मुस्लिम देखील उपासना करीत होते. काही लोक त्याला जल देव अवतार मानत.



**संकलन व सुलेखन**
**श्री कृष्णकुमार गो. निकोडे गुरुजी.**
**पोटेगावरोड, गडचिरोली,**
**फक्त मधुभाष– ७१३२७९६६८३.**

सिंधी समाजात भगवान झुलेलाल यांना अत्यंत आदराने पुजले जाते. ते वरुण देवतेचे अवतार होते अशी श्रद्धा आहे. भारतीय संस्कृती आणि इतिहासात सिंधु नदीचे खुप महत्व आहे. या सिंधु नदीच्या आसपासच्या प्रदेशात वास्तव्यास असलेल्या समाजास सिंधी समाज म्हटले जाते. तिथे राहणारे हिंदु आणि मुस्लिम दोघांना सिंधी म्हटले जाते. फाळणीनंतर सिंध हा प्रांत पाकिस्तानात गेला. बरेच सिंधी हिंदू तेव्हा भारतात स्थलांतरित झाले. त्यामुळे आज ते सिंधु नदीजवळ वास्तव्यास नसले तरी मूळची सिंधी ही ओळख आणि तिकडची संस्कृती जपण्याचा त्यांनी सतत प्रयत्न केला. सिंध प्रांत भारताच्या वायव्येस येतो. भारतात बहुतांश परकीय आक्रमणे हि याच दिशेने झाली. मुस्लिम धर्माची स्थापना झाल्यावर मध्यपूर्वेतल्या प्रांतातले बहुतांश लोक मुस्लिम धर्मात गेले आणि भारताच्या वायव्य दिशेला बरीच मुस्लिम साम्राज्ये अस्तित्वात आली. त्यातल्या बऱ्याच सुलतान आणि बादशहांनी वेगवेगळ्या काळात भारतावर आक्रमण करून इथे राज्य मिळवुन इथल्या लोकांनाही मुस्लिम धर्मात आणण्याचा प्रयत्न केला. मुस्लिम प्रांतांच्या अगदी जवळ असल्यामुळे सिंध प्रांतात त्यांच्याशी संपर्क जास्त येत असल्यामुळे धर्मांतराचे प्रमाण जास्त होते.

सिंध प्रांतात एक मिरकशाह नावाचा मुस्लिम राजा होता. तो आपल्या राज्यातील हिंदू जनतेचे बळजबरी धर्मांतर करत होता. सिंधी हिंदु लोक त्याच्या अन्यायाला कंटाळले होते. सिंधी लोकांचा सिंधु नदीशी जवळचा संबंध होता. प्राचीन काळापासुन ते जहाज गलबतांद्वारे प्रवास करून व्यापार करत होते. त्यामुळे त्यांच्यात जल देवता म्हणजेच वरुण देवाचे महत्व खुप होते. व्यापारी दौऱ्यावर गेले कि घरी त्यांच्या बायका जलदेवतेला त्यांना सुखरूप परत येता यावे, म्हणून प्रार्थना करत असत. राजाच्या अन्यायाला कंटाळुन त्यांनी नदीजवळ येऊन अनेक देवास प्रार्थना करत जलदेवतेलाच साकडे घातले. त्यांच्या प्रार्थनेला उत्तर द्यायला स्वतः वरुण देव माशावर प्रकट झाले आणि त्यांना सांगितले कि त्यांना अन्यायापासुन वाचवायला ते लवकरच नसरपूर गावी जन्म घेतील. काही दिवसातच नसरपूर येथे रतनचंद आणि देवकीच्या पोटी एका दिव्य बाळाने जन्म घेतला. त्याचे नाव ठेवले उदयचंद. बाळाने तोंड उघडले कि त्याच्या तोंडात सिंधु नदी आणि त्यात माशावर बसलेले वृद्ध माणसाच्या रूपात देवाचे दर्शन झाले. जलदेवतेचा अवतार म्हणुन उदेरोलाल असेही नाव पडले. संस्कृत मध्ये उदक म्हणजे पाणी. बाळाला पाळण्यात टाकल्यावर तो आपोआप झुलायला लागला आणि बाळ झोपी गेले. त्यामुळे त्याचे अजुन एक नाव पडले झुलेलाल. या चमत्कारी बाळाच्या जन्मामुळे लोकांमध्ये उत्साह संचारला. त्याची खबर राजापर्यंत जाऊन पोहोचली. त्याने त्या बाळाला मारण्याचे प्रयत्न केले, पण ते सफल झाले नाहीत. त्याचा वजीर जेव्हा त्या बाळाला पाहायला आला,



तेव्हा त्याच्या डोळ्यासमोर त्या बाळाचे रूपांतर एका प्रौढ माणसात झाले आणि लगेच पांढरी दाढी असलेल्या एका वृद्ध माणसात झाले. वजिराने हा चमत्कार राजाला जाऊन सांगितला. त्याने उडेरोलालला मारण्यासाठी सैन्य पाठवले. त्या सैन्याचा मार्ग पाण्याच्या मोठ्या लाटांनी अडवला. राजाच्या महालालाही आग लागली. स्वतः राजा क्षमा मागण्यासाठी गेला. झुलेलाल प्रकट झाले आणि त्यांनी राजाला माफ केले. त्याने सर्वांना सांगितले, ज्याला ईश्वर म्हणतात किंवा अल्लाह म्हणतात शेवटी तो देव एकच आहे. तर कशाला तुम्ही त्याला दुसऱ्या प्रकारे पुजणाऱ्या लोकांना त्रास देता? राजाचे मनपरिवर्तन झाले आणि तो स्वतः झुलेलालचा भक्त बनला. सोबतच अनेक मुस्लिम त्यांचे भक्त बनले. हिंदु मुख्यतः सिंधी झुलेलाल यांना जल देवता, वरुणाचा अवतार, उडेरोलाल अशा नावांनी पूजतात. तर सुफी परंपरेत त्यांनाच जिंदा पीर, दर्याशाह अशा नावांनी पूजतात. त्यांच्या जन्मदिवसाला चेती चांद, म्हणजेच चैत्र महिन्याचा पहिला दिवस. सिंधी लोक उत्साहाने साजरे करतात.भगवान झुलेलालजी यांचा जन्म सिंधमध्येच झाला होता. आजही सिंधी समाज आणि पाकिस्तानमधील काही भागातील लोक झुलेलाल जयंती किंवा चेतीचंद या नावाने त्याचा जन्म साजरा करतात. या दिवशी, सिंधी समाजाचे नवीन वर्ष सुरू होते, जे ते मोठ्या थाटामाटात साजरे करतात. पहिल्या हिंदु राजाने सिंधवर राज्य केले, राजा धारर हा शेवटचा हिंदू राजा होता, त्याला मोहम्मद बिन कासिमने पराभूत केले. मुस्लिम राजा सिंधच्या गादीवर बसल्यानंतर त्याच्या आसपास इस्लाम समाज वाढत गेला. दहाव्या शतकाच्या दुसऱ्या भागात सिंधच्या थट्टा राज्यावर शक सदाकत खानने ठार मारलेल्या मकरब खानने राज्य केले व स्वत:चे नाव मिरक शाह ठेवले आणि सिंहासनावर बसले. ते म्हणाले, जगात इस्लामचा विकास होईल तर हे नंदनवन होईल. त्यांनी हिंदूंवर अत्याचार करण्यास सुरवात केली, सर्व हिंदूंना सांगितले गेले होते की त्यांना इस्लामचा अवलंब करावा लागेल, अन्यथा त्यांना ठार मारले जाईल. अशा परिस्थितीत सिंधातील सर्व हिंदू खूप घाबरले, मग सर्व हिंदूंना सिंधू नदीजवळ एकत्र बोलावले. लोक तेथे एक हजाराहून अधिक जमले, सर्वांनी मिळून दर्याश जलदेवतेची उपासना केली आणि या आपत्तीत त्याला मदत करावी अशी त्यांनी प्रार्थना केली. प्रत्येकाने ४० दिवस सातत्याने ध्यान केले, त्यानंतर भगवान वरुण प्रसन्न झाले आणि त्यांनी आकाशवाणीच्या माध्यमातून सांगितले की त्यांचा जन्म देसरपुरात आणि ताराराचंद नासारपुरात होईल, तेच मूल त्याचा संरक्षक बनेल.संत झुलेलाल यांचा जन्म आकाशवाणीच्या दोन दिवसानंतर, चैत्र महिन्याच्या शुक्ल पक्षावर, उदयचंद नावाच्या नासरपूर (पाकिस्तानची सिंधू खोरे) येथील देवकी आणि ताराचंद यांना मुलगा झाला. हिंदी मधील उदय म्हणजे उदय. भविष्यात, हे लहान मूल हिंदू सिंधी समाजाचे रक्षक बनले, ज्याने मिरक शहासारख्या राक्षसाचा अंत केला. त्यांचे नाव प्रसिध्द करण्यासाठी उदयचंद जी यांनी सिंधातील हिंदूंच्या जीवनातील अंधकार संपवून प्रकाश पसरविला. प्रथम तो देवाचे रूप मानला जात नव्हता, परंतु केवळ त्याच्या जन्मानंतरच त्याने चमत्कार करण्यास सुरूवात केली. जन्मानंतर जेव्हा त्याच्या आई–वडिलांनी संपूर्ण सिंधू नदी त्याच्या तोंडात पाहिली, ज्यामध्ये पालो नावाचा एक मासा देखील पोहत होता, तेव्हा त्याला आश्चर्य वाटले. म्हणून झुलेलाल जी यांना पेल वरो देखील म्हणतात. सिंधी हिंदूंनी त्याच्यावर विश्वास ठेवला आणि त्याला देवाचे रूप मानले, म्हणून काही लोक त्याला अमरलाल देखील म्हणत. झुलेलाल जी यांना उडेरो लाल देखील म्हणतात, संस्कृतमध्ये असा अर्थ आहे की जो पाण्याजवळ राहतो किंवा पाण्यात पोहतो. उदयचंद यांचे लहानपणी झुलावर प्रेम होते, त्यावर तो विश्रांती घेत असे, त्यानंतर त्याचे नाव झुलेलाल पडले. त्याची आई देवकी त्याच्याशी प्रेमळपणे बोलत असे. त्याची आई लहान वयातच मरण पावली, त्यानंतर त्याच्या सावत्र आईने त्यांचे पालनपोषण केले.मीरकशहा यांनी सिंधातील सर्व हिंदूंना बोलावून विचारले, की ते इस्लामचा अवलंब करीत आहेत, की त्यांना मृत्यू हवा आहे. मग झुलेलाल जीचा जन्म झाला, प्रत्येकाचा त्यांच्यावर आणि वरुण देवच्या भविष्यवाणीवर पूर्ण विश्वास होता. मग प्रत्येकाने मीरकशहाबरोबर विचार करण्यासाठी अधिक वेळ मागितला. कारण त्यावेळी उदयचंद लहान होते, म्हणून मुल म्हणून एखाद्याला मारणे अशक्य होते, म्हणून सर्व हिंदूंना हा वेळ निघून जावा, अशी इच्छा होती आणि उदयचंद मोठा झाला. मिरकशहाला त्या मुलाबद्दल माहित होते, परंतु त्यांना असे वाटले की हा लहान मुलगा तरी काय करू शकतो? त्यांनी हिंदूंना अधिक वेळ दिला. मिरकशहा यांनी आपल्या एका मंत्र्याला मुलाच्या चौकशीसाठी पाठवले आणि त्याला ठार मारण्याचे आदेश दिले. झुलेलाल जी काळानुसार मोठे झाले, त्यांच्या आश्चर्यकारक कार्याची चर्चा लांब लांब पर्यंत पोहचू लागली. उदयचंदच्या विषयी ऐकून मीरकशहा देखील थकले आहेत, त्यांना भेटण्यासाठी आपल्या मंत्र्यांशी मिळून त्यांनी योजना केली. मीरकशाह हा खूप हुशार राजा होता, त्याच सभेत उदयचंदला पकडण्याचा त्यांचा विचार होता. पण मग एक चमत्कार घडला, जिथे ते भेटायला गेले होते, तेथे इतके पाणी होते की तेथे एक भयानक पूर आला. संपूर्ण सिंधू नदी वाहून गेली, सर्व नष्ट होऊ लागले. मिरकशहा यांना पळून जाण्याची जागा नव्हती, जेव्हा त्याने झुलेलालजींना प्रार्थना केली आणि म्हटले, की हिंदू मुस्लिम सर्वच देवाचे भाऊ व मुले आहेत. यापुढे कोणीही त्यांना धर्मांतर करण्यास भाग पाडणार नाही आणि म्हणेल की मी माझ्या आयुष्यात दिलेल्या वचनाचे पालन करेन. परंतु तुम्ही मला वाचवा. मग झुलेलालजींनी सर्वांना वाचवले.

!! भगवान झुलेलालजींना अवतरण दिनानिमित्त कोटी कोटी सादर दंडवत प्रणाम !!

## आमदार किशोर जोरगेवार यांनी केले बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे यांना अभिवादन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे यांच्या पुण्यतिथी निमित्त खोब्रागडे परिवारच्या वतीने खोब्रागडे भवन येथे कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी राजाभाऊ खोब्रागडे यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करुन अभिवादन केले.

यावेळी बाळु खोब्रागडे, देशक खोब्रागडे, माझी नगर सेवक पप्पू देशमुख, सुलभ खोब्रागडे, मारोतराव खोब्रागडे, अक्षय येरगुडे, राजु शेंडे आदींची प्रामुख्याने उपस्थिती होती.



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अनुयायी आणि समाजप्रबोधक बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे यांनी आपले अवघे जीवन समाजाच्या उन्नतीसाठी आणि समाजातील भेदभाव मुळापासून उखडून टाकण्यासाठी संघर्ष केला. बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे १८ वर्ष राज्यसभेचे खासदार राहिले. उच्च शिक्षण घेतल्यानंतर समाजासाठी काहीतरी करा हे शब्द त्यांनी मनात पक्के ठेवत स्वतःला भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीत झोकून दिले. पूढे आंबेडकरी चळवळीचे निष्ठावान नेते म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली.त्यांचे विचार आणि जीवन कार्य सदैव आमच्यासाठी मार्गदर्शक आणि प्रेरणादायी राहतील असे यावेळी आमदार किशोर जोरगेवार म्हणाले.

## संत गोरोबा कुंभार समाज सेवा समितीचे ना.सुधीर मुनगंटीवार यांना समर्थन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूर जिल्ह्यात मागील अनेक वर्षापासून ना.सुधीर मुनगंटीवार यांच्या नेतृत्वात विकासाचा झंझावात सुरू आहे. समाजातील सर्वच घटकांच्या प्रगतीच्या दृष्टीने प्रवाहित होत असलेली विकासाची गंगा अखंड प्रवाहित रहावी , अशी भावना व्यक्त करीत चंद्रपूर येथील संत गोरोबा कुंभार समाज सेवा समितीद्वारे ना. सुधीर मुनगंटीवार समर्थन जाहिर करण्यात आले आहे.

चंद्रपूर शहर आणि जिल्ह्यातील सर्व कुंभार बांधवांचे समर्थन पत्र समितीद्वारे सुधीर मुनगंटीवार यांना सोपविण्यात आले. समितीचे अध्यक्ष अशोक ताटकंटीवार, उपाध्यक्ष जगपाल खरे, सचिव अजय मार्कंडेवार, सहसचिव राकेश चात्रेशवार, कोषाध्यक्ष गजानन अमरोजवार, सदस्य सर्वश्री रविशंकर व्यवहारे, तानु खिरे, सुहास ताटकंटीवार, गणेश रामगुंडेवार, शरद मंचलवार, कैलाश पुराणकर, राजेश रामगुंडेवार, ऋषी चिरखरे, अनील चेरकुरवार आदींनी या समर्थनपत्रावर स्वाक्षरी करून पाठींबा आणि समर्थन जाहीर केले. चंद्रपुर–वणी–आर्णी लोकसभा क्षेत्राचे भारतीय जनता पार्टी महायुतीचे उमेदवार सुधीर मुनगंटीवार हे समाजात संस्कार घडवित आहेत. चांगले, विचार असलेल्या अशा नेतृत्वाची समाजाला गरज आहे. सुधीर मुनगंटीवार यांच्यारुपात चंद्रपूर–वणी–आर्णी लोकसभा क्षेत्राला महाराष्ट्रातील आघाडीचे नेतृत्व मिळाले आहे. समाजाच्या अडीअडचणी, समस्या सोडविण्यासाठी सुधीर मुनगंटीवार हे लोकसभेत हमखास विजयी होतील व समाजाच्या मागण्यांना न्याय देतील, असा विश्वास समाजाने समर्थन पत्रातून व्यक्त केला.

## भद्रावती येथे महाविकास आघाडीच्या उमेदवार प्रतिभा धानोकर यांच्या प्रचार कार्यालयाचे उद्घाटन



**भद्रावती । प्रतिनिधी**

चंद्रपूर–वणी–आर्णी लोकसभा मतदार क्षेत्रातील महाविकास आघाडीच्या उमेदवार प्रतिभा धानोरकर यांच्या प्रचार कार्यालयाचे उद्घाटन दिनांक ९ एप्रिल रोजी शहरातील मुख्य बाजारपेठेत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाचे जिल्हाप्रमुख मुकेश जिवतोडे व माजी नगराध्यक्ष अनिल धानोरकर यांच्या हस्ते पार पडले. यावेळी कार्यालयासमोर वच्छलाताई धानोरकर यांच्या हस्ते जुमलेबाजी तथा महागाई विरोधाची प्रतिकात्मक गुढी उभारण्यात आली होती. यावेळी शिवसेना उबाठाचे जिल्हाप्रमुख मुकेश जिवतोडे,माजी नगराध्यक्ष अनिल धानोरकर, काँग्रेसचे जिल्हा महासचिव धनंजय गुंडावर, अमित निब्रड, रमेश मेश्राम, वसंता मानकर,महेश जिवतोडे,बंडू चटपल्लीवार राष्ट्रवादीचे मुनाज शेख, राजू गैनवार, प्रफुल चटकी, प्रशांत काळे सुरज गावंडे, धर्मा गायकवाड, लीमेश माणूसमारे ,संदीप कुंमरे, सुरज शहा, सरिता सुर, कविता सुपी, लता इंदूरकर,लक्ष्मी पारखी, प्रतिभा सोनटक्के, कीर्ती पांडे व अन्य मान्यवर उपस्थित होते.

## बालविवाह केल्यामुळे लग्न घरातून वर व कुटुंबीय ताब्यात

### चाईल्ड हेल्पलाईन व जिल्हा बाल संरक्षण कक्ष यांची कारवाई

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

मुल तालुक्यातील एका गावात बालविवाह झाला असल्याची माहिती चाईल्ड हेल्पलाईनच्या १०९८ या टोल फ्री क्रमांकाद्वारे जिल्हा महिला व बालविकास कार्यालयास प्राप्त झाल्याने प्रशासनाने त्वरीत कारवाई करीत लग्नघरातून वर व कुटुंबियांना ताब्यात घेतले आहे.

३० मार्च रोजी चाईल्ड हेल्पलाईनच्या १०९८ क्रमांकावर मुल तालुक्यातील एका गावात बालविवाह झाला असल्याची माहिती प्राप्त झाली होती, माहितीच्या आधारे जिल्हा महिला व बालविकास अधिकारी यांच्या मार्गदर्शनात मुल पोलीस स्टेशनला सदर प्रकरणाची माहिती देण्यात आली व लगेच सदर गावाला भेट देवून वर व सर्व कुटुंबाला ताब्यात घेण्यात आले. मुल पोलीस स्टेशन येथे सदर गावातील ग्रामसेवक यांच्याद्वारे या प्रकरणात तक्रार देण्यात आली असून प्रकरणाचा पुढील तपास पोलीस यंत्रणा करीत आहे. या प्रकरणातील बालिकेला बाल कल्याण समिती समोर उपस्थित करण्यात येणार आहे. २१ मार्च रोजी रोजी सदर गावात प्रशासनाद्वारे बालविवाह जनजागृतीपर कार्यक्रम घेण्यात आला होता. यात बालविवाह होत असल्यास १०९८ या चाईल्ड हेल्पलाईनच्या टोल फ्री क्रमांकावर माहिती देण्याचे आवाहन करण्यात आले होते. यामुळे सदर प्रकरणाची माहिती यंत्रणेला मिळाली. जिल्ह्यात बालविवाह थांबविण्यास यंत्रणा सज्ज असून कुठेही बालविवाह होत असल्यास किंवा बालविवाह झाले असल्याची माहिती मिळाल्यास चाईल्ड हेल्पलाईनच्या १०९८ या टोलफ्री क्रमांकावर माहिती देण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. माहिती देण्याऱ्याचे नाव गुप्त ठेवण्यात येणार असून बालविवाह घडवून आणणाऱ्यांविरुद्ध कायदेशीर कारवाई केली जाणार आहे.सदर कारवाई जिल्हा महिला व बालविकास अधिकारी दिपक बानाईत, बालकल्याण समिती अध्यक्षा क्षमा बासरकर, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी अजय साखरकर यांच्या मार्गदर्शनाखाली अभिषेक मोहले, हर्षा वऱ्हाटे तसेच मुल पोलीस स्टेशन येथील पोलीस पथकाने केली.

## निवृत्ती वेतनधारकांनी मुळ बँक खाते सुरु ठेवावे

**चंद्रपूर**–चंद्रपूर जिल्ह्यातील सर्व निवृत्तीवेतन धारकांचे मासिक निवृत्ती वेतन हे मार्च २०२४ पासून ई – कुबेर प्रणालीमार्फत भारतीय रिझर्व्ह बँकेतून थेट निवृत्ती वेतनधारकांच्या खात्यात जमा होणार असल्याने निवृत्तीवेतन धारकांनी आपले मुळ बँक खाते सुरू ठेवण्याचे आवाहन जिल्हा कोषागार अधिकारी सुहास पवार यांनी केले आहे.पेन्शन जमा होण्यासाठी जी बँक निवृत्ती वेतनधारकांनी घेतली असेल त्याच खात्यातील आयएफएससी कोडनुसार ही पेन्शन जमा होणार आहे. जर काही पेन्शनधारकांनी कोषागार कार्यालयाची परवानगी न घेता परस्पर बँक खाते इतर जिल्ह्यात अथवा इतर बँकेत बदल करून घेतले असेल, अशा पेशनधारकांची पेन्शन जमा करण्यास अडचण निर्माण होतील. तरी ज्या पेन्शनधारकांनी बँक खाते इतर जिल्ह्यात अथवा इतर बँकेत बदल करून घेतले असतील त्यांनी त्यांचे मुळ बँक खाते ज्या बँकेत सुरु असेल तेच कायम ठेवावे. जेणेकरून निवृत्तीवेतन बँकेत जमा करण्यास अडचण जाणार नाही. तरी सर्व निवृत्तीवेतन धारकांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन जिल्हा कोषागार कार्यालयातर्फे करण्यात आले आहे.

## जिल्हाधिकाऱ्यांची मतदान प्रशिक्षण केंद्राला भेट




**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूर विधानसभा मतदार संघात नियुक्त मतदान कर्मचा–यांचे दुसरे प्रशिक्षण कॉर्मेल अकॅडमी येथे आयोजित केले होते. या प्रशिक्षण केंद्राला जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी भेट देऊन मतदान पथकांना १९ एप्रिल २०२४ रोजी होणाऱ्या निवडणुकीच्या अनुषंगाने सूचना दिल्या.

यावेळी ते म्हणाले, सर्वांनी निवडणूक आयोगाने दिलेल्या सूचनेप्रमाणे अचूक कामकाज करावे. उन्हाळा असल्याने आपली स्वतःची व मतदान केंद्रात येणाऱ्या मतदारांची काळजी घ्यावी. मतदान केंद्रावर लाईटची व्यवस्था, पिण्याचे पाणी, दिव्यांग मतदारांसाठी रॅम्प आणि व्हीलचेअर आदी बाबी असणे गरजेचे आहे. तसेच तापमान जास्त असल्यामुळे मतदारांना सावलीकरीता पेंडॉलची व्यवथा करण्यात यावी, ईव्हीएम योग्य पध्दतीने हाताळावे, अशा सुचना त्यांनी दिल्या. या प्रशिक्षणात मतदान पथकांना निवडणूक प्रकियेची सविस्तर कायदेशीर माहिती देण्यात आली. तसेच ईव्हीएम हाताळणीसाठी हॅन्डस् ऑन ट्रेनिंग देण्यात आले. मतदान कर्मचा–यांसाठी पोस्टल मतदान कक्ष सुरु होता.यावेळी सहा. निवडणूक निर्णय अधिकारी व उपविभागीय अधिकारी संजय पवार, तहसीलदार विजय पवार, तालुका कृषी अधिकारी भास्कर गायकवाड, तालुका आरोग्य अधिकारी कोमल मुनेश्वर व त्यांचे पथक आदी उपस्थित होते.

# माढा व सोलापूर लोकसभा मतदार संघात ७ मेला सार्वजनिक सुट्टी

## मतदानाचा हक्क निभावण्याचं आवाहन



**सोलापूर (वृत्तसंस्था) :** लोकशाहीच्या सर्वात मोठ्या निवडणुकीच्या उत्सवात मतदान करण्यासाठी देशांतील सर्व नागरिकांना सहभागी होता यावे. कोणीही मतदानापासून वंचित राहू नये, यासाठी ७ मे रोजी मतदानादिवशी सार्वत्रिक सुट्टी असणार आहे. त्यातील तिसऱ्या टप्प्यात निवडणूक होणार्या सोलापूर जिल्ह्यातील सोलापूर व माढा या दोन्ही लोकसभा मतदारसंघाचा सहभाग आहे. भारत सरकार गृहमंत्रालयाच्या अधिसूचनेनुसार महाराष्ट्र शासनातर्फे ही सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. मतदानादिवशी सार्वजनिक सुट्टी लोकसभा मतदारसंघ ४२- सोलापूर व ४३- माढा या क्षेत्रांतील जे मतदार कामासाठी त्या त्या मतदारसंघाबाहेर असतील त्यांना देखील लागू राहील. तसेच ही अधिसूचना राज्य व केंद्र शासनाच्या कार्यालये, निमशासकीय कार्यालये, सार्वजनिक उपक्रम व इतर प्रतिष्ठान यांनाही लागू राहील.या निमिताने सोलापूरचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी कुमार आशीर्वाद, उपजिल्हा निवडणूक अधिकारी गणेश निऱ्हाळी, भारत निवडणूक आयोगाचे स्वीप नोडल अधिकारी डॉ. सुधीर ठोंबरे, महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाचे स्वीप नोडल अधिकारी संदीप कोहिनकर, निवडणूक साक्षरता मंडळ वर्शिप अर्थ फौंडेशनचे सोलापूर जिल्हा समन्वयक सोमनाथ पवार यांनी सोलापूर व माढा मतदार संघातील सर्व मतदारांना आवाहन केले आहे.मतदानदिनाच्या सुट्टीदिवशी सर्वांनी देशहिताच्या या पवित्र कार्यात मतदान करून सहभागी व्हावे. लोकशाहीने आपल्याला बहाल केलेले बहुमोल मत मतदानाच्या रुपात दान करून भारत देशाची लोकशाही अधिक बळकट करण्यासाठी आपले अनमोल व भरीव योगदान द्यावे. आपला हक्क व अधिकाराची अंमलबजावणी करावी, असं आवाहन अधिकाऱ्यांनी केलं आहे.

लोकसभेच्या निवडणुकीतील मतदानाची टक्केवारी खूप कमी आहे. त्यात वाढ व्हावी, सर्वांनी मतदान करून ही टक्केवारी १०० व्हावी यासाठी मतदानादिवशी सर्वांना सुट्टी असेल असे भारत निवडणूक आयोगाचे स्वीप नोडल ऑफीसर तथा सोलापूर जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा सोलापूर विभागाचे प्रोजेक्ट डायरेक्टर डॉ. सुधीर ठोंबरे यांनी दिली. दरम्यान, मतदान केल्यानंतर ज्याना कामावर जायचे ते खासगी क्षेत्रातील लोक पुन्हा कामावर जाऊ शकतात, असंही त्यांनी सांगितलं.

## तुम्ही पाठवलेले खासदार आरक्षण, महागाई,जीएसटी,दुध दरावर बोलले का?



**मंगळवेढा (वृत्तसंस्था)** – पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे बघून तुम्ही दहा वर्षात दोन खासदार पाठवले, त्यांनी संसदेत महागाई, जीएसटी, दूध दर, आरक्षण या प्रश्नावर एकदा तर बोलले का? असा सवाल आ. प्रणिती शिंदे यांनी तालुक्यातील तळसंगी ते बोलताना व्यक्त केला.

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर त्यांनी आज खोमनाळ, फटेवाडी, तळसंगी, डोणज, बोराळे, सिद्धापूर या भागाचा गाव भेट दौरा केला. त्यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी त्यांच्या समवेतकार्याध्यक्ष ॲड. नंदकुमार पवार, धनश्री परिवाराचे शिवाजीराव काळुंगे, शिवसेनेचे तालुकाध्यक्ष प्रा. येताळा भगत, तालुकाध्यक्ष प्रशांत साळे, अर्जुनराव पाटील, सुरेश कोळेकर, पांडुरंग चौगुले, जिल्हा उपप्रमुख तुकाराम भोजने, नंदा ओमने, क्रांती दत्तू, विष्णु शिंदे, शिवशंकर कवचाळे, ॲड. रविकरण कोळेकर, अजय आदाटे, मनोज माळी, बापू अवघडे, आयेशा शेख, सुनीता अवघडे, नाथा ऐवळे, अमोल मामाने, जयश्री कावचाळे, म्हांतेष पाटील, शिवाजी काळे, संजीव कवचाळे, सैफन शेख, चेतन पाटील, संगणा घोडके, कुमार धनवे, संदीप बाबर, प्रशांत सगेलकर, विष्णू भंडगे, आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

यावेळी बोलताना आ. शिंदे म्हणाल्या की, मोदी लाटेत खासदार झालेल्यांनी २०१४ ते १९ या काळात कोणतेही काम केले नाही. तरीही तुम्हाला खोटे बोलून तुमच्याकडून पुन्हा २०१९ ते २४ या कालावधीत मते घेतली. पुन्हा तीच परिस्थिती निर्माण झाली. आणि आता पुन्हा खोटे बोलून मते मागण्यासाठी येत आहेत. परंतु आम्ही तुम्हाला वस्तुस्थिती सांगण्यासाठी आलो आहोत.तुमच्या प्रश्नासाठी महाविकास आघाडी सरकार पाठीशी राहील असा विश्वास देत सरकारने महागाई वाढवत तीनशे रुपयेला मिळणारा सिलेंडरमध्ये चौपट वाढ करून ठेवली. दुध दर कमी केला. त्यावर दिले जाणारे अनुदान अद्याप दिले नाही.शेतकऱ्यांनी भरलेल्या पिकाचा विमा अजून दिला नाही. शेतकऱ्याला मिळणाऱ्या खतावर जीएसटी लावली, पन्नास रुपयाच्या चपलीवर दीडशे रुपये जीएसटी लावणारे तुम्हाला दोन हजार रुपये मिळतात असे सांगून पुन्हा दिशाभूल करू लागल्याचे सांगितले. या दौऱ्यात ॲड. नंदकुमार पवार, प्रा. शिवाजीराव काळुंगे, प्रशांत साळे, पांडुरंग चौगुले, प्रा. येताळा भगत, ॲड. रविकिरण कोळेकर यांची भाषणे झाली.

## सह्याद्री इंग्लिश मीडियम येथे कराटेच्या कलर बेल्ट परीक्षा संपन्न

**सांगोला । प्रतिनिधी**



शाओलीयन वर्ल्ड मार्शल आर्ट शाखा सांगोला यांच्यामार्फत दिनांक ७ एप्रिल २०२४ रोजी सह्याद्री इंग्लिश मीडियम सांगोला येथे कराटेच्या कलर बेल्ट परीक्षा घेण्यात आल्या या परीक्षेला एकूण ५४ मुलांनी सहभाग घेतला होता या परीक्षेला बँकोक थायलंड व मलेशिया कोल लांमपूर येथील जागतिक स्तरावरील कराटे चा नवीन अभ्यासक्रम घेण्यात आला व नवीन व जुना अभ्यासक्रम यातील फरकक सांगण्यात आला विविध व्यायाम प्रकार कता कुमिते किक्स ब्लॉक चॉप नवीन कता प्रकारच्या टेक्निक नवीन कुमिते (फाइट ) प्रकाराच्या टेक्निक घेण्यात आल्या विविध जागतिक स्तरावरील कराटेचा अभ्यास आंतरराष्ट्रीय ख्यातीचे जी.के वाघमारे सरानी जागतिक स्तराचा अभ्यासक्रम घेतला यशस्वी विद्यार्थ्यांना मान्यताप्राप्त राष्ट्रीय पंच निजेंद्र चौधरी श्रावणी वाघमारे मॅडम आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक श्री सुनील वाघमारे सर यांचे मार्गदर्शन लाभले या परीक्षा यशस्वी करण्याकरता मयंक स्वामी आशिष कोकरे आवेश फारुकी राधिका गारळे धनश्री एडगे आदींनी काम पाहिले.



**रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए ) पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मान. दिपकभाऊ निकाळजे यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष प्रमुख उद्धवजी ठाकरे साहेब यांची घेतली आज भेट तेव्हा महिला प्रदेश अध्यक्षा सुनिताताई चव्हाण, प्रदेश कार्याध्यक्ष बाळासाहेब पवार , प्रदेश उपाध्यक्ष दादासाहेब ओव्हाळ, प्रदेश संघटक कैलास जोगदंड , प्रदेश सचिव अशोक ससाणे , कार्यालय प्रमुख तानाजी मिसळे, नितीन जाधव ,देवेंद्र मोहन,चद्रशेखर सकपाळे,प्रशात केळशीकर,नितीन जाधव ,ठाणे जिल्हा महासचिव तथा अकोला लोकसभा प्रभारी सचिन कोकणे, प्रशांत तोरणे , राजू कटारनवरे, प्रदीप सोनवणे, ,सचिन खरात , आकाश घोडके , शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते**

## शिवसेना शिंदे गटाची दुसऱ्या टप्प्यातील उमेदवारांची यादीही लांबणीवर पडली

**मुंबई । प्रतिनिधी**



महायुतीमध्ये भाजपच्या दादागिरीपुढे हतबल झालेले मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दुसऱ्या टप्प्यातील आपल्या उमेदवारांचा निर्णय दोन तीन दिवसांनंतर होईल,असे आज मुंबईतील पदाधिकाऱ्यांच्या बैठकीनंतर जाहीर केले. त्यामुळे शिवसेना शिंदे गटाच्या इच्छुक उमेदवारांना आणखी काही दिवस वाट पहावी लागेल हे स्पष्ट झाले.


मुख्यमंत्री शिंदे यांनी आपल्या वर्षा निवासस्थानी पदाधिकाऱ्यांची बैठक बोलावली होती. या बैठकीत उमेदवारांच्या नावांबद्दल काही निर्णय होईल अशी अपेक्षा होती.मात्र निवडणुकीच्या काळात पदाधिकाऱ्यांच्या बैठका होतच असतात. आजची बैठकीही निवडणुकीच्या रणनितीवर चर्चा झाली,असे सांगत मुख्यमंत्री शिंदे यांनी बैठकीत ठोस निर्णय झाला नसल्याचे संकेत दिले.

विदर्भात महायुतीसाठी अत्यंत उत्साहवर्धक वातावरण आहे. मी स्वतः विदर्भात जाऊन हा अनुभव घेतला आहे.त्यामुळे विदर्भातील सर्व जागा महायुतीचे उमेदवार मोठ्या मत फरकाने जिंकतील हे निश्चित आहे,असे शिंदे म्हणाले.याप्रसंगी शिंदे यांनी शिवसेना उद्धव ठाकरे गटावर टीका केली.आम्ही पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना विश्वासात घेऊन काम करतो. रस्त्यावर उतरून, लोकांच्या प्रत्यक्ष गाठीभेटी घेतो. उंटावरून शेळ्या हाकत नाही. त्यांच्याकडे (उद्धव ठाकरे गट) ना अजेंडा आहे, ना झेंडा.त्यांनी दुसऱ्याच्या घरात डोकावून पाहण्यापेक्षा आपल्याकडे काय कुठे जळत आहे हे बघावे,असा टोला शिंदे यांना हाणला.

दरम्यान, शिंदे गटाचे नेते संजय शिरसाट यांनी रत्नागिरी-सिंधुदूर्ग, नाशीक, पालघर आणि संभाजीनगर या जागांसाठी आम्ही आजही आग्रही आहोत,असे सांगत या जागांवरून महायुतीमध्ये तिढा कायम आहे, याचे स्पष्ट संकेत दिले.

## चंद्रपूर,गडचिरोलीमध्ये गारपीटीची शक्यता

**पुणे**–राज्यात उन्हाचा चटका असह्य होत असतानाच वादळी पावसाला पोषक हवामान झाले आहे. आज विदर्भ, मराठवाड्यात गारपीटीची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. यामध्ये प्रामुख्याने चंद्रपूर आणि गडचिरोलीमध्ये गारपीटीचा अंदाज आहे. तर धुळे,



नंदुरबार, जळगाव, नाशिकसह अनेक जिल्ह्यांत वादळी पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील जिल्ह्यांमध्ये काही आज पावसाची शक्यता आहे. तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह सोसाट्याच्या वाऱ्यासह हलका पाऊस होण्याची शक्यता आहे. धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक, अहमदमगर, सोलापूर, नांदेड, लातूर, उस्मानाबाद या भागात हवामान विभागाने यलो अलर्ट जारी केला आहे.तर अकोल्यात विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता आहे. त्यासोबतच नागपूर, गोंदिया आणि यवतमाळमध्येही तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता पावसाचा अंदाज असून यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. चंद्रपूर आणि गडचिरोलीमध्ये काही भागात गारपीट आणि वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. तसेच मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील जिल्ह्यांमध्ये ३०- ४० किमी प्रतितास वेगाने सोसाट्याचे वारे वाहण्याची शक्यता आहे.दरम्यान, एकीकडे राज्यात पावसाचा अंदाज आहे. मात्र काही भागात उन्हाच्या झळा बसत आहेत. एप्रिल महिन्याच्या पहिल्याच आठवड्यात राज्यासह देशातील तापमानात वाढ होताना दिसत आहे. विदर्भात काही ठिकाणी उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे. तर मराठवाड्यात पुढील दोन दिवस रात्रीच्या वेळी उकाडा वाढण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. तर राज्यात पुढील २४ तास पारा ४० अंशांवरच राहण्याची शक्यता आहे.

## निवडणूक रणनीतीसाठी वर्षावर शिवसेना शिंदे गटाची विशेष बैठक



**मुंबई**–लोकसभा निवडणुकीसाठी पुढील रणनीती तसेच उमेदवारी व प्रचारासंदर्भातील सूक्ष्म नियोजन यांसाठी शिवसेना शिंदे गटाच्या खासदार, आमदार तसेच प्रमुख नेत्यांची विशेष बैठक आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वर्षा ह्या निवासस्थानी आयोजित करण्यात आली होती.

महायुतीतील.मित्रपक्षांबरोर अद्याप वाद कायम असलेल्या कल्याण, ठाणे, उत्तर पश्चिम मुंबई, रत्नागिरी सिंधुदुर्ग, संभाजीनगर तसेच नाशिक इत्यादी जागांबाबत चर्चा बैठकीत झाली. ह्या जागा शिवसेनेने सोडू नये यासाठी उपस्थित नेत्यांनी आक्रमक पवित्र घेतला. शिवसेनेचे जेवढे खासदार आहेत, त्यापेक्षा जास्त जागा शिवसेनेला मिळतील आणि १०० टक्के स्ट्राईक रेट ठेवल्यास शिवसेना एनडीएमधील दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष असेल, असे मुख्यमंत्री शिवसेना नेत्यांना समजावले.वाद असला तरी मित्रपक्षांबरोबर समन्वयाचीच भूमिका कायम ठेवून त्यांना विश्वासात घेऊन एकजुटीने नियोजनपूर्वक प्रचार सुरू ठेवण्याच्या अगदी तळागाळातील समाज घटकांपर्यंत पोहोचायच्या सूचना बैठकीत देण्यात आल्या.बाबुराव कदम या सर्वसामान्य गरीब कार्यकर्त्याला उमेदवारी दिल्याने राज्यात चांगला मेसेज गेला आहे.हिंगोलीतील उमेदवार चांगला आहे,त्यांच्या वडिलांनी चांगली कामे केली आहेत.तिकीट नाकारले तरी कुणावरही अन्याय होणार नाही.निवडणुकीत एक एक मत महत्त्वाचे आहे,ओव्हर कॉन्फिडन्समुळे अनेकांचा घात झाला आहे,त्यामुळे जोमाने काम करा. विकासावर बोला, पक्षाची तत्वे, विचार यांवर बोला. आरोप प्रत्यारोपांच्या भानगडीत पडू नका', असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेना नेत्यांना सांगितले. याशिवाय काँग्रेसचा एक मोठा नेता पक्षप्रवेशासाठी संपर्कात असल्याबाबतही चर्चा झाली.खासदार राहुल शेवाळे, राज्यातील मंत्री तानाजी सावंत, आमदार संदीपान भूमरे, तसेच नेते विजय शिवतारे यांच्यासह शिवसेना शिंदे गटाचे मुख्य नेते बैठकीस उपस्थित होते.

## शिर्डीतून माझ्या उमेदवारीला राधाकृष्ण विखे पाटील यांचा विरोध–रामदास आठवले

**अहमदनगर**–माझ्या शांत स्वभावाचा फायदा सर्वजणच घेतात. जागा वाटपावरून मीही वाद घातला असता; पण तसे केले नाही. शिर्डीची जागा आरपीआय पक्षाला देऊ नये, रामदास आठवले हे प्रबळ उमेदवार नाहीत, असे पत्र राधाकृष्ण विखे-पाटील यांनी उपमुख्यमंत्री फडणवीस यांना दिले होते. त्यामुळे मला उमेदवारी मिळाली नाही, असा आरोप केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी केला आहे.



दरम्यान शिर्डीची जागा मला मिळाली नाही. राधाकृष्ण विखे-पाटलांनी मला शिर्डीतून तिकीट मिळू नये, यासाठी पत्र लिहिले होते, असा गौप्यस्फोट आठवलेंनी केला आहे. एका वृत्तपत्राशी बोलताना त्यांनी विखे पाटील यांच्यावर आरोप केला आहे.रामदास आठवले म्हणाले की, निवडणूकपूर्व सर्वेक्षणाचे दाखले देत भाजपने मिंधे गटाच्या अनेक नेत्यांच्या उमेदवारीला प्रखर विरोध केला. अजित पवार यांच्या राष्ट्रवादीतून कुणाला उमेदवारी द्यावी, याच्या सूचना भाजप नेतृत्वाने केल्या. जिंकून येणाऱ्या उमेदवारालाच उमेदवारी, असाच निकष ठेवण्यात आला. हेच लक्षात घेऊन, शिर्डीसाठी रामदास आठवले प्रबळ उमेदवार नसल्याचे कारण पुढे करून विखे-पाटील यांनी माझ्या उमेदवारीला तीव्र विरोध करत आरपीआयला ही जागा देऊ नये, अशी भूमिका फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे मांडली, असे आठवले यांनी सांगितले.रामदास आठवले पुढे बोलताना म्हणाले की, मी माझ्या कार्यकर्त्यांना विचारले, आपल्याला जागा मिळत नाही, काय करायचे? युती तोडायची का? मात्र सगळ्यांनीच सांगितले, तुम्ही सत्तेत असणे महत्त्वाचे आहे. जरी जागा मिळाली नाही तरी आपली राज्यसभा २०२६ पर्यत आहे. आपण भाजपच्या वरिष्ठ नेत्यांसोबत बोलून कॅबिनेट मंत्रीपदाची मागणी करावी. आपण मोदींच्या सोबत राहायला पाहिजे, असे ते यावेळी म्हणाले.

सह्याद्रीचा राखणदार



# सुमधुर संगीताने झाला पुलगावकरांचा नववर्ष प्रारंभ

## पाडवा पहाट आयोजन समितीचे उत्कृष्ट आयोजन

**पुलगाव । प्रतिनिधी**

चैत्र शुद्ध प्रतिपदा गुढीपाडवा हा आपल्या भारतीयांचा नववर्ष दिवस मानला जातो. या नवीन वर्षाचे स्वागत अंगणात सडा, रांगोळी, गुड्या, तोरणे, मंगल वाद्य वादन या पारंपारिक पद्धतीने आपण करतो. गुढीपाडव्याच्या निमित्ताने पाडवा पहाट आयोजन समिती व विवेकानंद नागरी सहकारी पतसंस्था यांच्या वतीने महालक्ष्मी हँडलूमच्या समोर, भगतसिंग चौक, पुलगाव. येथे पहाटे पाच वाजता ते नऊ वाजेपर्यंत सुरेल गीतांची महफिल पाडवा पहाट कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले . या कार्यक्रमाला पुलगावकरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या कार्यक्रमाला गायक नागपूर भूषण पुरस्कार प्राप्त व सा रे ग म प कलाकार निरंजन बोबडे , मुंबईच्या सा रे ग म प कलाकार गायिका जयश्री करंबेळकर ,प्रसिद्ध गायिका ऐश्वर्या शिंदे , पुजा टिकेकर तसेच गायकांचा संच व निवेदिका ज्योती भगत यांनी सादर केला.

कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून पुलगाव पोलीस ठाण्याचे निरीक्षक दिपक सोनवणे यांच्या हस्ते गुढी पूजन करण्यात आले. व पाडवा पहाट आयोजन समितीचे अध्यक्ष बबन बरवड, प्रमुख पाहुणे सुरेशराव गणेशपुरे, विवेकानंद नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष प्रदीप पांडे,प्रमुख पाहुण्या शोभाताई रामदासजी तडस, प्रा. मदनकर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात संस्कार भारतीच्या ध्येय गीताने करण्यात आले. ध्येय गीत गाण्याकरिता कल्याणी भांडे, रिद्धी भांडे, सिद्धी भांडे, ऋजुता देशमुख,व तबला वादक संकेत बाभळे, हार्मोनियम वर्षा बाभळे यांचा संच सज्ज होता. मंचासमोर सुंदर देखणी रांगोळी सुभाष जगताप, व गजेंद्र गालपिल्लेवार यांनी साकारली होती.

त्या नंतर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे अतिथींचे स्वागत करण्यात आले.

सुरेल गीतांची महेफिल सूरु झाली. निरंजन बोबडे यांच्या आवाजातून सूर निरागस हो गणपती या सुंदर गीताने सुरवात करून रसिकांना मंत्रमुग्ध केले. कार्यक्रमात रसिकांना सुंदर गाण्याची मेजवानी मांडतांना निवेदिका ज्योती भगत यांनी सुद्धा आपल्या शैलीतून रसिकांचा उत्साह द्विगुणित करीत होत्या, रसिकांच्या सुरेल गीतांच्या मेजवाणीत गगन सदन तेजोमय, खेळ




मांडीयला वाळवंटी, माझे माहेर पंढरी, स्वये श्रीराम प्रभू ऐकती, पुलगावची कन्या सारेगमप कलाकार कल्याणी भांडे हिने बाजेरे मुरलीया बाजे गीत सादर केले. त्या नंतर निरंजन बोबडे यांनी गोंधळ सादर केला उदे ग अंबे उदे, राधा ही बावरी,राणी माझ्या मळ्यामंदी येशील का?,

अश्या अनेक गाणी गाऊन रसिकगणांनी पाडवा पाहाट चा आनंद लुटला. यात रसिकगणांच्या आग्रहास्तव लावणी गीत सुद्धा सादर करण्यात आले व लोकांनी अप्रतिम दाद देत पुलगाव येथील अरुण जाधव यांनी आपल्या नृत्यातुन ठेका धरून जनतेचा उत्साह द्विगुणित केला. यावेळी उत्कृष्ट ध्वनी व्यवस्था त्रिशूल साऊंड सिस्टीमने सर्व कार्यक्रमात रंगात आणली. हे ध्वनी व्यवस्था हाताळण्यास पवन नौकरकर, व पंकज नौकरकर यांनी सहकार्य केले.

कार्यक्रमाच्या शेवटच्या टप्प्यात जनतेला चंद्रकांत पवार यांच्या कडून प्रसाद वाटप करून कार्यक्रम संपन्न झाला.

कार्यक्रमाला यशस्वी करण्याकरिता पाडवा पहाट आयोजन समितीचे अध्यक्ष बबन बरवड, उपाध्यक्ष नुरसिह जाधव, शिला कपले,सचिव गणेश इंगळे, सहसचिव हर्षल काळे, कोषाध्यक्ष राजेश देशपांडे,सभासद मंडळ विठ्ठल वानखेडे, रवी किरण भोजने, महादेवराव कणसे, विनोद सावसाकडे,हेमंत येंडे, संदीप बोरकुटे, सागर तुरक, , संतोष बैतुले, प्रतिभा रायपुरे, वर्षा बाभळे, संगीता देशमुख, मंदा तरंगे, देवेंद्र सोनटक्के, रवी पाठक, सुभाष जगताप, सुधीर बांगरे ,सौरभ श्रीराव,दिपाली काळे मॅडम, पंकज तिवारी,विठ्ठलराव वानखडे, अविनाश भोपे, चंद्रकांत पवार, विजय भांडे, प्रशांत मोहोड, विवेकानंद पतसंस्थेचे अध्यक्ष प्रदीप पांडे, व्यवस्थापक अतुल लोणकर,अरविंद हलमारे,विवेक वरकड, नंदू बोराटने, अनुराग फलके, मंगेश ठाकरे, निखिल धोपडे, अक्षय पाठक, रोशन डाहे, विवेक पोहरे, मनोज काणे, शुभम कडू, ज्ञानेश्वर गोमासे , यांनी सहकार्य केले. दिपाली काळे यांनी संचालन ,तर आभार विवेकानंद नागरी सहकारी पत संस्थेच्या संचालिका प्रज्ञा हनुमंते यांनी मानले.

# मूठभर चारा,पोटभर पाणी, गाईसाठी बकेटभर पाणी

## महाविद्यालयीन कर्मचारी प्रमोद नागापुरे यांची अविरत सेवा

**वरोरा । प्रतिनिधी**

आनंद निकेतन महाविद्यालय आनंदवन चे कर्मचारी प्रमोद नागापुरे यानी नोकरी सांभालून सामाजिक सेवेचा वसा घेतला असून शहरी व ग्रामीण भागात त्यांची अविरत समाजसेवा सुरु आहे.

प्रमोद नागापूरे हे पशु पक्षावर जीवापाड प्रेम करतात , बारा वर्षापासुन बाराही महीने मूठभर चारा , पोटभर पाणी,आणि गाईसाठी बकेटभर पाणी हा उपक्रम राबवित आहे.पक्षाकरिता आपल्या घरी वॉल कपाउंड चे भींतीवर एका भांड्यामध्ये पाणी व दुसर्या एका भांड्यामध्ये पक्षासाठी चारा म्हणून तांदुल ठेवल्या जातात,पक्षी येतात चारा खातात , पाणी पितात ,चारा संपला काय? पाणी संपले काय? याची कालजी मात्र प्रमोद नागापुरे यांच्या पत्नी शारदा नागापूरे हया विमा अभिकर्त्या असुन व्यस्त कामातून वेल काढून लक्ष पूरवितात. ती त्यांची दिनचर्याच ठरली आहे. तसेच मोकाट फिरनारे मूके जनावरे



(गोमाता) व त्यांचे वासरे ज्याना शेतकऱ्याची लक्ष्मी मानली जाते.अशा गोमाता व वासरांची तहान भागविन्यासाठी घराचे दरवाज्यासमोर बकेटभर पाणी ठेवल्या जातात.आपल्या घरी असलेले शिळे अन्न फेकुन न देता मुक्या जनावराना खाऊं घालतात .मानवाप्रमाने मुक्या प्राण्यांची सेवा करने हिच खरी ईश्वर सेवा आहे.असे समजून ते अविरत सामाजिक सेवेच्या प्रवाहात असते. तसेच सामाजिक व धार्मिक उपक्रम राबवीत असतात. नुकतेच त्यांच्या आईचे निधन झाले ,समाजात तेरवी कार्यक्रम करण्याची परंपरा आहे.परंतु त्यानी तेरवी परंपरेला फाटा देत कोटगांव येथे जी. प.प्राथमिक शाळा , अंगनवाड़ी केद्र व कृषक विद्यालयामध्ये विद्यार्थ्याना भोजन दिले.एकंदरित नागापुरे कुटुंबाच्या या आगळ्या वेगळ्या उपक्रमामुळे त्यांचे सर्व समाज स्तरातुन अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. समाजाला आपल्याकडून काही देण लागत ते दिले पाहिजे, नाही तर आपन तुपाशी आणि समाज व मूके जनावरे उपाशी अशा स्थितिमध्ये समाजात परिवर्तन घडावे यासाठी नागापुरे हे प्रत्येक समाज घटकामध्ये एकप्रकारची जनजागृति करीत आहे.समाजघटकांशी समनव्य ठेउन गरजवंत लोकांच्या गरजा पूर्ण करण्याचा सदोदित प्रयत्न करीत असतात.प्रमोद नागापुरे हे सामाजिक संघटनेला वरोरा तालुक्यात एक प्रेरणादायी व्यक्तिमत्व ठरले आहे.

# सुधीरभाऊ सिर्फ नाम ही काफी है...! अखेर सुरक्षा रक्षकांना मिळाले वेतन

## भाजपा जिल्हा महामंत्री विवेक बोढे यांच्या प्रयत्नांना यश


**घुग्घुस । प्रतिनिधी**

येथील खाजगी सुरक्षा रक्षकांना भाजपा जिल्हा महामंत्री विवेक बोढे यांच्या प्रयत्नांमुळे अखेर वेतन मिळाले.

मुंगोली ते घुग्घुसपर्यंत रेल्वे रुटाचे व पुलाचे नवीन बांधकाम सध्या युद्धपातळीवर सुरु आहे. यासाठी वेकोलितर्फे झेटवर्क या खाजगी कंपनीला कामाचे कंत्राट देण्यात आले. कामाच्या ठिकाणी सुरक्षा रक्षक तैनात करण्याचे कंत्राट एससिएस या सुरक्षा एजन्सीला दिले.या एजन्सीकडे घुग्घुस परिसरातील १७ ते १८ युवक सुरक्षा रक्षक म्हणून काम करीत होते. या सुरक्षा एजन्सीने १७ ते १८ सुरक्षा रक्षकांचे वेतन मागील दोन महिन्यापासून दिले नाही त्यामुळे सुरक्षा रक्षक व त्यांच्या कुटुंबियांवर उपासमारीची वेळ आली सुरक्षा रक्षक आर्थिक संकटात सापडल्याने त्यांनी ना. सुधीरभाऊ मुनगंटीवार सेवा केंद्रात येऊन भाजपा जिल्हा महामंत्री



विवेक बोढे यांची भेट घेतली व आपली समस्या सांगितली.ही समस्या लक्षात घेत विवेक बोढे यांनी तत्काळ कंपनीच्या अधिकाऱ्यांना ही समस्या सांगितली तसेच सुरक्षा रक्षकांचे वेतन देण्यासाठी सांगितले.त्याअनुषंगाने सुरक्षा कंपनीने सुरक्षा रक्षकांना तत्काळ एका महिन्याचे वेतन दिले आणि उर्वरित वेतन लवकरच देण्याचे आश्वासन दिले.सुरक्षा रक्षकांना वेतन मिळाल्याने त्यांनी ना. सुधीरभाऊ मुनगंटीवार सेवा केंद्रात भाजपा जिल्हा महामंत्री विवेक बोढे यांची सदिच्छा भेट घेतली व त्यांचे आभार व्यक्त केले.यावेळी सुधीर बोढे, आकाश गिरसावडे, मंगेश डांगे, प्रकाश वर्मा, देवकुमार केशकर, सतीश वाकूलकर, बालाजी मोरे, दुर्गराज कालवा, विशाल टेकाम, राज नान्हे, प्रल्हाद दाडगे, रोनित कालवा, श्रेयश सोदारी, बादल सोदारी, संदीप निखाडे, आशिष बोढे, अमन सोदारी, सचिन कोणपल्लीवार आदींची उपस्थिती होती.



सध्या उन्हाळा ऋतू चालू असुन उन्हाची तीव्रता वाढत आहे. वडाच्या सावलीत ओट्यावर बसून नागरिक आराम करत आहेत. छाया :प्रणय बांगरे.

# गिरगांवच्या महात्मा ज्योतिबा फुले शिक्षण संस्थेच्या अध्यक्ष,सचिव व शिक्षिकेस लाच घेतांना रंगेहात पकडले

## लाचलूचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई ; शिपाई पदासाठी १२ लाख रुपये मागितले

**तळोधी (बा) । प्रतिनिधी**

नागभीड तालुक्यातील गिरगांव येथील एका विधवा महिलेच्या मुलाला वडिलांच्या जागेवर अनुकंपा तत्वावर कायमस्वरूपी नोकरीवर घेण्यासाठी १२ लाखाची मागणी करणाऱ्या महात्मा ज्योतिबा फुले शिक्षण संस्थेच्या अध्यक्ष,सचिव आणि सावित्रीबाई फुले विद्यालय व जुनिअर कॉलेजच्या शिक्षिकेस १लाख ५० हजार रुपयांची लाच घेतांना लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात पकडल्याची घटना दि.८ एप्रिल रोज सोमवार रोजी घडली.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार अँटी करप्शन ब्युरो चंद्रपूर येथे तक्रार दाखल करणाऱ्या महिलेचे पती तालुक्यातील गिरगांव येथील महात्मा ज्योतिबा फुले शिक्षण संस्था संचालित सावित्रीबाई फुले विद्यालय व जुनिअर कॉलेज येथे शिपाई सेवक म्हणून कार्यरत होते.मात्र त्यांच्या अचानक निधनानंतर पतीच्या जागेवर अनुकंपा तत्वाखाली मुलाला नोकरीवर घेतले यासाठी १ लाख रुपये तक्रारदार महिलेकडून घेतले.त्यानंतर दि.३१मार्च रोजी पुन्हा सदर महिलेस फोन करून कायमस्वरूपी नोकरीवर स्थिर करण्यासाठी १२ लाख रुपयांची मागणी केली.दरम्यान तक्रारदार महिलेची लाच देण्याची तयारी नसल्याने त्यांनी अँटी करप्शन ब्युरो चंद्रपूर येथे तक्रार दाखल केली. त्यानंतर संस्थेचे अध्यक्ष मोतीराम सखाराम मोहुर्ले यांच्या तळजोडीनंतर १२ लाख रुपयांपैकी १ लाख ५० हजार रुपये देण्याचे ठरले.आणि संस्थेचे सचिव मधुकर मोतीराम मोहुर्ले यांच्या सिंदेवाही येथील राहते घरी त्यांनी सदर रक्कम स्वीकारली.आणि सापडा कारवाई दरम्यान लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी रंगेहात पकडले. दरम्यान पदाचा दुरुपयोग करून स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी लाच रकमेची मागणी करून ती स्वीकारल्याने महात्मा ज्योतिबा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मोतीराम सखाराम मोहुर्ले (वय ७९ वर्ष ) संस्थेचे सचिव मधुकर मोतीराम मोहुर्ले (वय ५२ वर्ष ) व सदर संस्था संचालित सावित्रीबाई फुले विद्यालय व जुनिअर कॉलेजच्या शिक्षिका मंगला मधुकर मोहुर्ले (वय ५० वर्ष ) यांना चंद्रपूर लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने ताब्यात घेतले आहे. सदर वृत्त लिहिपर्यन्त कारवाई सुरू होती.ही कारवाई ला.प्र.वि. नागपूर परीक्षेत्र नागपूरचे पोलीस अधीक्षक राहुल माकणीकर यांच्या मार्गदर्शनाखाली ला.प्र.वि चंद्रपूर च्या पर्यवेक्षण अधिकारी पोलीस उप अधीक्षक मंजुषा भोसले,लाप्रविचे पोलीस निरीक्षक प्रशांत पाटील,वैभव गाडगे,अमोल सिडाम पुष्पा काचोळे,सतिश सिडाम यांनी केली आहे.

# पराभव दिसू लागताच संभ्रमाचे राजकारण करण्याची काँग्रेसची केविलवाणी धडपड

## अर्धवट व्हिडीओ प्रसारित करणाऱ्या काँग्रेसचा देवराव भोंगळे यांनी घेतला समाचार

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

विकासाची दृष्टीच नसलेले काँग्रेस नेते आणि कार्यकर्ते जनतेची दिशाभूल करून मतं मागतात ही नवीन बाब नाही. मात्र आता तर सारी हद्दच पार करत, सुधीरभाऊंच्या भाषणाचा अर्धवट व्हिडिओ व्हायरल करून काँग्रेसने त्यांची संकुचित आणि कपटी मानसिकता दाखवली आहे, असा घणाघाती आरोप करून या कृतीचा निषेध भारतीय जनता पक्षाचे नेते देवराव भोंगळे यांनी केला आहे.

सोमवारी ८ एप्रिल रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची विशाल जाहीर सभा चंद्रपुरात पार पडली. या सभेमध्ये चंद्रपूर-वणी-आर्णी लोकसभा क्षेत्राचे भाजपा आणि महायुतीचे उमेदवार सुधीर मुनगंटीवार याचे जोरदार भाषण झाले. या भाषणाचा अर्धवट व्हिडिओ काँग्रेसकडून व्हायरल करून दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला गेला. काँग्रेसच्या या कृतीचा भोंगळे यांनी परखड शब्दांत समाचार घेतला.

चंद्रपूर लोकसभा मतदारसंघात ना.सुधीर मुनगंटीवार यांना मिळणारा व्यापक प्रतिसाद पाहून काँग्रेसच्या पायाखालची वाळू सरकली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विराट जाहीर सभेनंतर तर काँग्रेसची प्रचंड गोची झाली आहे. त्यामुळे अर्धवट व्हिडिओ व्हायरल करण्यासाठी काँग्रेसची केविलवाणी धडपड सुरू असल्याचा घणाघातही देवराव भोंगळे यांनी केला.ते पुढे म्हणाले, पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या विशाल सभेमध्ये उपस्थित लाखोंचा जनसमुदाय पाहुन काँग्रेसला पराभवाची भिती वाटू लागली आहे,या भीतीपोटी समाज माध्यमांचा दुरुपयोग करत ही संतापजनक, कपटी केविलवाणी कृती केली. यावेळी बोलताना भाषणात सुधीर मुनगंटीवार यांनी काँग्रेसच्या 'हुकूमशाही विरुद्ध लोकशाही'च्या पोस्टरबाजीला उत्तर देताना आणीबाणीच्या काळातील अत्याचार, निरपराध लोकांना तुरुंगावास यासह १९८४ ला सर्वसामान्य शीख समाज बांधवांवर झालेले काँग्रेसच्या राजवटीतील जनतेवर झालेल्या अमानुष अत्याचारांचा पाढा वाचत होते. व अमानवीय अत्याचाराबद्दल काँग्रेसला जाब विचारत



होते. मात्र सुधीर मुनगंटीवार यांच्या या संपूर्ण भाषणाचा विशिष्ट भाग कट करून व्हिडिओ व्हायरल करण्यात आला. काँग्रेसने या भाषणाचा या संदर्भातील पूर्ण व्हिडिओ वायरल करायला हवा होता; परंतु त्यांनी आपल्या सोयीनुसार विशिष्ट २३ सेकंदाचा व्हिडिओ वायरल केला. जनतेमध्ये संभ्रम निर्माण करण्याची केविलवाणी धडपड करीत असलेल्या काँग्रेसने 'सच्चाई बदल नहीं सकती, आपकी झुठी व्हिडिओबाजी से और नौटंकी से' हे लक्षात ठेवावे, असा सज्जड इशाराही देवराव भोंगळे यांनी दिला.

महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांना पराभूत करण्यासाठी प्रयत्न करणारे काँग्रेसचे नेते जनतेत संविधान आणि घटना दुरुस्तीबाबत आपल्याच मनाने आरोप करत आहे त. पण एक गोष्ट लक्षात ठेवा, डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या घटनेत काँग्रेसने सत्तेत असताना त्यांच्या सोयीप्रमाणे अनेक वेळा बदल केले, याऊलट मोदी सरकारने एससी व एसटी आरक्षणाला १० वर्षाची मुदतवाद दिली. नागपूर, चंद्रपूर दीक्षा भूमीचा विकास असो किंवा बाबासाहेबांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या स्थळांचा विकास बुद्ध सर्किट च्या माध्यमातून भाजपाच्या काळात झाला. यानंतरही काँग्रेस चोराच्या उलट्या बोंबा मारत निराधार अपप्रचार करत आहे.

आपल्या विकासदृष्टीने चंद्रपूरचा कायापालट करणारे सुधीर मुनगंटीवार हे एक सुसंस्कृत आणि उच्च विद्याविभूषित नेते आहेत. संघर्षातून आणि विकासाच्या दुरदृष्टीतून हा संवेदनशील नेता प्रत्येक माणसाच्या हृदयात आहे. त्यांनी वस्तुस्थिती मांडली व काँग्रेस राजवटीतील अमानवीय अत्याचाराच्या घटना जनतेसमोर मांडल्या. हजारो आदिवासी महिलांना रोजगार, त्यांच्या उत्कर्षांसाठी एसएनडीटी महाविद्यालय, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे नाव पुणे विद्यापीठाला तर संत गाडगेबाबा यांचे नाव अमरावती विद्यापीठाला देण्यासाठी घेतलेला पुढाकार, डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी वाचनालयच्या माध्यमातून शेकडो मुलींसाठी अभ्यासिकेची सोय केली. यासोबतच जिल्ह्यामध्ये अनेक विकासाची कामे जनतेच्या हद्यापर्यंत पोहचली आहे. या जिल्ह्याचा विकासपुरुष म्हणून जनतेने त्यांना स्वीकारले आहे.केवळ पराभवाच्या भीतीमुळे मतदारांना भ्रमित करण्याचे काम काँग्रेस करत आहे.हिंम्मत असेल तर काँग्रेसनी विकासाकामावर बोलण्याचे आवाहन देवराव भोंगळे यांनी केले आहे

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .